सत्यमेव जयते

ठाणे जिल्हा परिषद प्रकाशन





अंक पहिला । ऑक्टोबर २०१७

# भरारी



# मनोगत



ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या ठाणे जिल्ह्याचा बहुतांश भाग ग्रामीण असून विविध जाती-धर्म-पंथाचे नागरिक येथे गुण्यागोविंदाने नांदतात हे जिल्ह्याचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. हा जिल्हा ग्रामीण, दुर्गम व आदिवासी भागात वसल्या कारणाने आरोग्यापासून पिण्याच्या स्वच्छ पाण्यापर्यंतचे अनेक प्रश्न या जिल्ह्यासमोर उभे असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे हाती घेतल्यावर लक्षात आले. म्हणून सुरुवातीपासूनच प्रत्येक विभागवार नियोजनपूर्वक कृती आराखडा तयार केला आणि कामाला सुरुवात केली.

मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीस गती मिळाली.

'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत प्रारंभापासूनच संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने प्रयत्न केले. जिल्ह्यासाठी संपूर्ण लक्ष्यांक १ लाख ९४ हजार २४ एवढा होता तर २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार ९१ हजार २२५ वैयक्तिक शौचालये बांधण्याचा लक्ष्यांक होता. हा मार्च २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आला. त्यामुळे ठाणे जिल्ह्याला देशात ९ वा तर राज्यात ५ वा क्रमांक प्राप्त झाला. तसेच प्रगत शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे केल्याने जिल्हा परिषदेच्या शाळा प्रगतीपथावर आल्या. विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या असणाऱ्या १,३६३ शाळा शंभर टक्के डिजिटलही झाल्या.

अन्न, वस्त्र, आणि तिसरी मूलभूत गरज म्हणजे निवारा. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यासाठी सन २०१७-१८ मध्ये ७१७ इतका लक्ष्यांक देण्यात आलेला असून त्यानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने घरकुलांना ऑनलाइन मंजुरी दिली आणि प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली.



शासनाची ' अभिलेख अद्ययावतीकरण व झीरो पेंडन्सी ॲन्ड डेली डिस्पोजल' ही महत्त्वाकांक्षी योजनाही राबवत असून जिल्हा परिषदेच्या प्रगतीची दिशा ठरवत शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, मुबलक पाणी, महिला सक्षमीकरण, समाज कल्याण, घरकुल, पशुसंवर्धन या सर्व क्षेत्रांमध्ये जिल्हा परिषदेचे कामकाज नियोजनपूर्वक सुरू आहे. येणाऱ्या काळात ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शासनाच्या योजना प्रत्यक्ष राबविण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून ग्रामीण भागातही सोयीसुविधा उपलब्ध होतील आणि विकासाची 'भरारी' घेता येईल असा मला विश्वास वाटतो.

धन्यवाद !

**विवेक भीमनवार**
*मुख्य कार्यकारी अधिकारी*
*ठाणे जिल्हा परिषद*




# अशी आहे आपली जिल्हा परिषद

ठाणे जिल्हा परिषदेची पहिली लोकनियुक्त परिषद (Elected Body) १२.०८.१९६२ रोजी अस्तित्वात आली. नववी लोक प्रतिनिधींची लोकनियुक्त परिषद २१.०३.२०१२ पासून कार्यरत होती. ती १ ऑगस्ट, २०१४ पासून ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा अस्तित्वात आल्यामुळे बरखास्त झाली आहे. १ ऑगस्ट २०१४ पासून जिल्हा परिषदेचे कामकाज प्रशासकीय नियंत्रणाखाली सुरू आहे.

## ठाणे जिल्हा सर्वसाधारण माहिती

**एकूण तालुके** : ०७
**एकूण पंचायत समित्या** : ०५
**आदिवासी पंचायत समित्या** : ०१
**अंशत: आदिवासी पं. समित्या** : ०२
**नागरी पंचायत समित्या** : ०२
**एकूण ग्रामपंचायतींची संख्या** : ४३०
**एकूण महसुली गावांची संख्या** : ८०८ (पैकी १० गावे ओसाड)
**एकूण पेसा गावे** : ३९९
**पेसा ग्रामपंचायत संख्या** : २०४
**लोकसंख्या (२०११ जनगणना अस्थायी)** : ८०,५८,९३०
**दारिद्र्य रेषेखालील कुटुंब संख्या** : ७१,६९२
**बेघर/कच्चे घर कुटुंब संख्या** : ३७,२८०

## जिल्हा परिषद गट (०१.०८.२०१४)

**जि.प. कार्यकारिणी पंचायत समिती गण** : अस्तित्वात नाही
**जिल्हा परिषद सर्वसाधारण बॉडी** : विषय समित्या

## भौगोलिक स्थिती

**दुर्गम डोंगरी** : शहापूर
**सागरी** : ठाणे
**औद्योगिक दृष्ट्या** : अंबरनाथ, मुरबाड, कल्याण, भिवंडी
**हवामान** : उष्ण व दमट
**पर्जन्यमान** : सरासरी २००० ते ३५०० मि.मि.
**नदी** : वैतरणा, उल्हास.
**पश्चिमवाहिन्या नद्या** : तानसा, भातसा, बारवी.
**धरणे** : तानसा, भातसा, बारवी.

## कृषी विषयक माहिती

**भौगोलिक क्षेत्र** : ४,०९,१८६ हे.
**जंगलव्याप्त क्षेत्र** : १,४६,६०१ हे. (३६%)
**शेतीस उपलब्ध नसलेले क्षेत्र**
**बिगर शेती क्षेत्र** : ८८९१७ हे. (२२%)
**पडीक व लागवडी लायक नसलेले** : ८४५०० हे. (२२%)
**पडीक व्यतिरिक्त लागवड न झालेले** : ९७८४ हे. (२ % )
**पडीक क्षेत्र** : ८२४२ हे. (२ %)

**लागवडी खालील एकूण क्षेत्र** : ७१,१४२ हे. (२%)
**लागवडीलायक एकूण क्षेत्र** : ८०,९२६ हे. (२०%)

## जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळे

**पर्यटन स्थळे** : माऊली, आजापर्वत, वज्रेश्वरी, शीतगड, गोरखगड, संगम, टाकीपठार
**मंदिरे** : सोमनाथ, टिटवाळा गणपती

## आरोग्य केंद्राविषयी माहिती

**प्राथमिक आरोग्य केंद्र** : ३३
**उपकेंद्र** : १८६
**पथक** : ०५
**जिल्हा परिषद दवाखाना** : ०३
**पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१** : २२
**पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२** : ४२

## शैक्षणिक चित्र

**एकात्मिक बालविकास सेवा केंद्र** : ०९
**एकूण अंगणवाडी केंद्रे** : १५९६
**एकूण मिनी अंगणवाडी केंद्रे** : २५८
**एकूण शाळा** : ३४१३
**जिल्हा परिषदेच्या शाळा** : १३६३

## जिल्हा परिषद विभाग

जिल्हा परिषदेंतर्गत एकूण १४ विभाग कार्यरत असून
वर्ग-१ चे ११४
वर्ग-२ चे ५१
वर्ग-३ चे ५६१६ आणि
वर्ग-४ चे ४२९ असे
एकूण ६,०४५ कर्मचारी कार्यरत आहेत.

## इतर महत्त्वाचे

**आय.एस.ओ.** : आय.एस.ओ. मानांकन मिळवणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद

**यशवंत पंचायत राज अभियान** : २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या वर्षातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याने राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त.
२ वर्षे सतत प्रथम पुरस्कार प्राप्त. तसेच

**२०११-२०१२ या वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी** केल्याने पंचायत समिती भिवंडीस राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त.

**पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व योजना** (PEIS) : २०११-२०१२ या वर्षांत सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याने राष्ट्रीय पातळीवरील पारितोषिक प्राप्त.

**स्वउत्पन्नाचे बजेट** : स्वउत्पन्नाचे सर्वांत जास्त बजेट सादर करणारी राज्यातील पहिली जिल्हा परिषद
२०१३ – २०१४ रु. १३५.६३ कोटी
२०१४ – २०१५ रु. १२६.४१ कोटी
२०१५ – २०१६ रु. ११०.४४ कोटी
२०१६ – २०१७ रु. ७०.०८ कोटी

# नावीन्यपूर्ण उपक्रम

## अध्ययन अक्षमता समजावून घेताना

अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थांना मूलभूत शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे 'अध्ययन अक्षमतेला समजून घेताना' ही नावीन्यपूर्ण योजना राबविण्यात आली आहे. ठाण्यातील डॉ. आनंद नाडकर्णी यांची 'आयपीएच' ही संस्था या योजनेसाठी सहकार्य करीत आहे.

'मूल लिहायला, वाचायला शिकलं की त्याला भाषिक व गणितीय क्रिया व्यवस्थित आल्या पाहिजेत,' अशी पालकांची आणि शिक्षकांची अपेक्षा असते. मात्र तसं झालं नाही तर वेगवेगळ्या मार्गाने पाल्याचा अभ्यास करून घेतला जातो. पण आपला पाल्य असा का वागतो, याचा मात्र पालक शोध घेत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी

> 'हरितकन्या' या योजनेअंतर्गत ठाणे व मुंबई येथील मोठ्या गृहसंकुलात आठवड्यातून एकदा शेतीमाल व भाज्या विक्रीसाठी नेण्यासाठी मोफत वाहतुकीची व्यवस्था पुरवली जाते

अधिकारी विवेक भीमनवार यांच्या संकल्पनेतून आकाराला आलेली 'अध्ययन अक्षमतेला समजून घेताना' ही योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेमुळे एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे.

या योजनेची भिस्त शिक्षकांवर असल्याने त्यांच्यासाठी 'आयपीएच' संस्थेमार्फत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले गेले. यातूनच मास्टर ट्रेनर तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

प्रत्येक मूल शिकले पाहिजे, हे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे अध्ययन अक्षम असणारे विद्यार्थी शालाबाह्य राहू नये, यासाठी ही योजना राबविली जात असल्याचे शिक्षणाधिकारी मीना यादव म्हणाल्या.









## स्वयंपूर्ण शाळा

* जिल्हा परिषदेच्या शाळा स्वयंपूर्ण करण्यासाठी ५४ प्रकारचे निकष ठरवण्यात आले असून प्रत्येक शाळा स्वयंपूर्ण करणे हे आमचे ध्येय आहे.

## 'हरितकन्या' व ग्रामीण रोजगार

'हरितकन्या' या नावीन्यपूर्ण योजनेचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या योजनेअंतर्गत ठाणे व मुंबई येथील मोठ्या गृहसंकुलात आठवड्यातून एकदा शेतीमाल व भाज्या विक्रीसाठी नेण्यासाठी मोफत वाहतुकीची व्यवस्था पुरवली जाते, असे प्रकल्प अधिकारी डॉ. रूपाली सातपुते यांनी सांगितले.

या व्यवस्थेत दलाल वगळले गेल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अधिक दर मिळतो. तसेच स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी विविध संस्थांच्या सहकार्याने त्यांची उत्पादने उच्चभ्रू नागरी वस्तीत विकण्याची संधी या योजनेमुळे उपलब्ध झाली आहे.

## औजारे बँक : शेतीत क्रांतिकारी पाऊल

ठाणे जिल्हा परिषदेने भात शेतीत क्रांतिकारी बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र पाटील यांच्या संकल्पनेतून 'औजारे बँके'चे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे, अशी माहिती जिल्हा कृषी अधिकारी डॉ. प्रफुल्ल बनसोडे यांनी दिली.

२०१५-१६ व १६-१७ या वर्षात अनुक्रमे ३,२५० ग्रामसंघांना ५००.०० लाख अनुदान वितरित करण्यात आले. २०१७-१८ या आर्थिक वर्षात ११२ लाख एवढी तरतूद केलेली आहे.

जिल्हा परिषदेने आपल्या सेस निधीतून औजारे बँक ही नावीन्यपूर्ण योजना आणली असून यामध्ये भात लावणी ते काढणीपर्यंतची कामे विविध यंत्रांद्वारे केली जातात. उदा. भात रोवणी यंत्र, भात मळणी यंत्र, भात कापणी यंत्र इ.

ग्रामीण भागातील नोंदणीकृत महिला बचतगटांचे ग्रामसंघ निवडून त्यांना जास्तीतजास्त ७ लाख रुपयांपर्यंत अनुदान देऊन औजारे उपलब्ध करून दिली जातात.

यंदाच्या वर्षी यासाठी २ कोटी रुपये अनुदानाचे वाटप करण्यात येत आहे.

भात शेतीसाठी सर्वात जास्त खर्च हा मजुरांवर होतो. भात लागवडीसाठी जमीन तयार करणे, चिखलणी, लावणी, काढणी, मळणी या प्रत्येक कामासाठी मजूर लागतात. मात्र या यंत्रांमुळे लावणीच्या खर्चात ५० टक्के, तर मजुरांच्या संख्येत व वेळेत ७५ टक्के बचत होत असून एका तासासाठी अर्धा लिटर डिझेल लागते व एका दिवसात तीन एकर क्षेत्राची लावणी होते. यासाठी फक्त चार मजूर लागतात.

भात लावणीपासून काढणीपर्यंत एकंदर ८७ मजूर प्रतिदिन लागतात. एका दिवसासाठी या मजुरांचा खर्च हेक्टरी ३० हजार ४५० रुपये येतो. (३५० रुपये प्रतिदिन मजुरी). संपूर्ण ठाणे जिल्ह्यात

६० हजार ७१७ हेक्टर जमिनीवर भाताची लागवड केली जाते आणि संपूर्ण प्रक्रियेसाठी ५२ लाखांपेक्षा जास्त मजूर लागतात. त्यांची केवळ मजुरीच १८४.५२ कोटी होते. एकूण उत्पादन खर्चाच्या ९० टक्के खर्च हा मजुरीवर होतो.
ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी यांत्रिकीकरणाची कास धरल्यास वेळ, पैसा व श्रमात बचत होऊन शेती फायदेशीर ठरू शकते.
भात शेतीवर देण्यात येणारा भर कमी करून बारमाही शेती कशी करता येईल त्याचप्रमाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भाजीपाला लागवड मोठ्या प्रमाणात करून त्याचे विपणन व्यावसायिक पद्धतीने व्हावे व त्यातून त्यांना चांगला नफा मिळावा या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत.
या यंत्राने लावणी करण्यासाठी चटई रोपवाटिकेची (मॅट नर्सरी) आवश्यकता असते. अशी रोपवाटिकाही गावात श्रीराम ग्राम संस्था, वडवली यांनी केली आहे.
महिला बचतगट अशी अत्याधुनिक औजारे चालवण्याचे प्रशिक्षण घेऊन शेतकऱ्यांना काही रक्कम आकारून शेतीची विविध कामे करून देतात. यामुळे ग्रामीण भागातील महिलांना शेतीतून रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन उत्पन्नाचा स्रोत निर्माण झाला आहे. खरीप हंगाम संपल्यानंतर भात शेतीची कामे संपतात. त्याच जागेवर रब्बी आणि उन्हाळी हंगामात भेंडी, दोडके, पडवळ यासारखी भाजीपाल्याची पिके घेत असल्याचे महिलांनी सांगितले.

## स्वयंपूर्ण अंगणवाडी

* अंगणवाडीच्या स्वयंपूर्णतेचे १४ विविध निकष निश्चित करून अंगणवाड्या स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने योजना आखण्यात आली असून सर्व अंगणवाड्या स्वयंपूर्ण करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.
* स्मार्ट अंगणवाडी: तसेच या वर्षी २०० अंगणवाड्या या स्मार्ट अंगणवाड्या करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.
* जिल्ह्यात १,५९६ अंगणवाडी, २५८ मिनी अंगणवाडी अशा एकूण १,८५४ अंगणवाड्या असून ९ प्रकल्पांत SM १२७ बालके व MM ची ६०४ बालके आहेत. (प्रमाण ०.१ टक्के)


डिजिटल शाळा


स्वच्छतेची शपथ


दिव्यांग मेळावा

* इमारत संख्या ४८६ अंगणवाडी, १५० अंगणवाड्यांची बांधकामे प्रगतीत.
* या वर्षी सर्व अंगणवाड्या परिपूर्ण करण्याचे नियोजित आहे. (सर्व निधी स्रोतातून)
* Child Friendly अंगणवाड्या करण्यावर अधिक भर देण्याचे नियोजित आहे.

## विद्यार्थ्यांना वाटली लाखभर अंडी

* जागतिक अंडी दिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत १ लाख अंड्यांचे वाटप करण्यात आले अशी माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रशांत कांबळे यांनी दिली.

## दिव्यांगांना बळ देताना

जिल्ह्यातील विविध दिव्यांग संस्थांच्या विद्यार्थ्यांनी दिवाळी सणाच्या निमित्ताने तयार केलेल्या गृहोपयोगी वस्तूंना बाजारपेठ मिळावी यासाठी ठाणे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने ठाण्यातील गावदेवी मैदानात विक्री मेळावा पार पडला.
यावेळी जिल्ह्यातील वीस संस्थांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. आकर्षक दिवाळी कंदील, दिवे, पणती, तोरण, मेणबत्ती, उटणे, दिवाळी फराळ, पेपर बॅग, हातरुमाल, किचन ॲप्रन, चॉकलेट्स, ज्वेलरी, किचन नॅपकिन्स, मसाले, गिफ्ट एन्व्हलप, रंगीत फुलांचे बुके व फुले आणि इतर गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी ठाणेकरांनी येथे गर्दी केली होती.
या मेळाव्यात अस्तित्त्व मतिमंद मुलांची शाळा, जव्हेरी ठाणावाला कर्णबधीर विद्यालय, जागृती पालक संस्था, कमलिनी कर्णबधीर विद्यालय, किशनचंद चेलाराम स्कूल, क्षितिज मतिमंद मुलांची शाळा, एम.बी.ए. फौंडेशन, ओमकार कर्णबधीर विकास संस्था, पालवी कर्णबधीर विद्यालय, प्रज्ञा-करुणा मूकबधिर विद्यालय, पॅराप्लेजिक्स फौंडेशन, रोटरी स्कूल ऑफ डेफ, राजहंस फौंडेशन ऑटिस्टिक व्होकेशनल सेंटर, रिहॅबिलिटेशन ऑफ पॅराप्लेजिक्स, संवाद कर्णबधीर प्रबोधिनी, स्नेहालय मतिमंद मुलींची शाळा, स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान, सेंटर फॉर स्पेशल चिल्ड्रन, विकास मतिमंद विद्यालय, विश्वास चॅरिटेबल ट्रस्ट आदी संस्था सहभागी झाल्या होत्या, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी रविकिरण पाटील यांनी सांगितले.

## गरोदर मातांची सोनोग्राफी तपासणी

ठाणे जिल्हा परिषदेमार्फत २०१६-१७ मध्ये ही नावीन्यपूर्ण योजना सुरू करण्यात आली. आतापर्यंत एकूण ८ हजार ७९५ गरोदर मातांची सोनोग्राफी करण्यात आली. सोनोग्राफी तपासणी करून घेतल्याने गरोदरपणातील संभाव्य धोके, गुंतागुंत वेळीच निदर्शनास आल्याने त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांना यश आले. त्यामुळे गेल्या वर्षाच्या तुलनेत अर्भकमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण कमी झाले असून संस्थेतील प्रसूतीच्या संख्येत वाढ झाली आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बी. एस. सोनावणे यांनी सांगितले.

# प्रमुख योजनांची अंमलबजावणी

## सर्वांसाठी घरे योजनेत आघाडी

- प्रधानमंत्री आवास योजना २०१७-१८ मध्ये ठाणे जिल्ह्यासाठी एकूण ७१७ इतका लक्ष्यांक देण्यात आला असून त्यानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत घरकुलांना ऑनलाइन मंजूरी देण्यात आली आहे.
- पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचे वाटप करण्यात तर २०१६-१७ मध्ये घरबांधणी पूर्ण करण्यात ठाणे जिल्हा परिषद राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे.
- शबरी, रमाई या योजनांतर्गत ४ हजार ९४८ घरे जिल्ह्यात बांधण्याची योजना असून ती नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहे
- तालुका पातळीवरील सततच्या पाठपुराव्यामुळे लाभार्थींना पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचे वाटप केले गेले आहे.

## स्वच्छ ग्रामीण ठाण्यासाठी

- हागणदारीमुक्तीमध्ये ठाणे जिल्हा हा देशात ९ व्या तर राज्यात ५ व्या क्रमांकावर आहे. २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार शौचालय नसलेली ९१ हजार २२५ एवढी कुटुंबे होती. त्यानुसार २०१६-१७ पर्यंत ९१ हजार २२५ हा संपूर्ण लक्ष्यांक पूर्ण करण्यात आला. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील एकूण ४३० ग्रामपंचायती हागणदारी मुक्त झाल्या. त्यानुसार ठाणे (ग्रामीण) जिल्हा १००% हागणदारी मुक्त झाल्याचे घोषित करण्यात आले आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर राजे निंबाळकर यांनी यासाठीचा राज्य शासनाचा पुरस्कारही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमिताभ बच्चन यांच्या हस्ते स्वीकारला.
- विशेष मोहिमेअंतर्गत वैयक्तिक शौचालयांचे फोटो वेबसाईटवर टाकले असून ३५०० वैयक्तिक शौचालये बांधण्याची योजना तयार केली आहे.

## जलसंपदा विभागाने सीएसआरमधून भोज व उसगांव लघु प्रकल्प (अंबरनाथ), वेहळोली, खराडे (शहापूर), व जांभूर्डे (मुरबाड) प्रकल्पातील गाळ काढला

बांधकाम सुरू झाले असून पायाभूत सर्वेक्षणाव्यतिरिक्त उर्वरित ३१.१०.२०१७ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ५,००० लोकसंख्येवरील ३५ ग्रामपंचायतींसाठी भूमीगत गटारे, घन कचरा व्यवस्थापन व प्रक्रिया, जलशुद्धीकरण या योजनांचे आराखडे व काम लवकरच सुरू करण्यात येईल असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणीपुरवठा) मानसी बोरकर यांनी सांगितले.

## सर्वांना स्वच्छ पाणी

- दुष्काळप्रवण अशा शहापूर तालुक्यातील ९७ गावे व २५९ पाडे, तसेच मुरबाड तालुक्यातील ५० गावांना भावली आणि पिंपळगाव जोगा या धरणांमधून नैसर्गिक गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळाली असून लवकरच या योजनेचे काम सुरू होत आहे.
- प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेल्या भावली आणि पिंपळगाव जोगा या धरणांतील पाणीसाठ्याबाबत सर्वोच्च पातळीपर्यंत पाठपुरावा करून मुख्यमंत्र्यांकडून पाणीसाठ्याबाबत मंजुरी मिळवण्यात यश
- ही योजना पूर्ण होण्यास दोन वर्षांचा कालावधी अपेक्षित असून तिचा फायदा अंदाजे दोन लाख ग्रामीण लोकसंख्येला होईल अशी अपेक्षा आहे.

**अपूर्ण/अकार्यक्षम पाणीपुरवठा योजनांकडे लक्ष:**

- गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांपैकी अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या अपूर्ण/अकार्यक्षम पाणीपुरवठा योजनांकडे विशेष लक्ष दिले. त्यापैकी १६३ योजना विशेष पाठपुरावा करून पूर्ण सुरु करण्यात यश आले.
- उर्वरित योजनांसाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात आला.

## डिजिटल शाळा

- २०१६-१७ मध्ये १,३६३ प्राथमिक शाळा (१०० टक्के) Digital करण्यात आल्या. तसेच ६७७ शाळांमध्ये लोकसहभागातून हॅन्डवॉश स्टेशन बांधण्यात आली आहेत.

## प्रगत शिक्षणाच्या वाटेवर

- जिल्ह्यात एकूण १,३६३ प्राथमिक शाळा असून ४,०४८ शिक्षक मंजूर आहेत. सद्यास्थितीत ३,५३२ शिक्षक कार्यरत आहेत तर शाळांमध्ये ८८,११५ विद्यार्थी आहेत.
- शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आपल्या नेहमीच्या कार्यकक्षेच्या पलीकडे जाऊन नावीन्यपूर्ण प्रकल्प राबविणाऱ्या शिक्षकांची माहिती संकलित करून 'स्पंदन शिक्षणाचे मंतरलेल्या शिक्षकांचे' या पुस्तकाचे संपादन केले.
- पारदर्शी आदर्श शिक्षक पुरस्कार : यंदा जिल्हा स्तरीय आदर्श शिक्षक निवडण्यासाठी कुशल व त्रयस्थ व्यक्तींकडून परीक्षण करून घेतले. त्यामुळे शिक्षक निवड प्रक्रिया अधिक पारदर्शकरित्या करण्यात आली.
- 'शाळासिद्धी' अंतर्गत जिल्ह्यातील ५४६ शाळा 'अ' श्रेणीत आल्या असून त्यामध्ये ६७ जि.प. शाळांचा समावेश आहे.
- जिल्ह्यातील १,३६३ पैकी ८१३ शाळा प्रगत असून उर्वरित शाळा या वर्षाअखेर प्रगत



हागणदारी मुक्त जिल्हा पुरस्कार



प्रधानमंत्री आवास योजना शुभारंभ



करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे या शाळांची चाचणी software द्वारे करण्यासाठी काम सुरू आहे.

## प्रतिस्वाक्षरी अट रद्द

* बदली किंवा शाळा सोडण्याच्या दाखल्यावर शिक्षणाधिकाऱ्यांची सही अनिवार्य असल्याने दरवर्षी जवळपास चाळीस हजार विद्यार्थ्यांना किंवा त्यांच्या पालकांना ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यालयाला भेट द्यावी लागत असे. मात्र या स्वाक्षरीची आवश्यकता नसल्याचे लक्षात येताच मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक भीमनवार यांनी शासनासोबत या विषयांतर्गत चर्चा केली आणि शासनाने ही बाब सकारात्मक घेत ३० मे २०१७ रोजी सुधारित अध्यादेश काढला. त्यानुसार प्रतिस्वाक्षरीची अट रद्द करण्यात आली. त्याप्रमाणे याचा लाभ संपूर्ण राज्यभरातल्या सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना झाला.

## विद्यार्थ्यांची सुरक्षा

शाळांमध्ये गठित करण्यात आलेल्या समित्यांनी शालेय शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे गरजेचे असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही बसवण्याचा प्रयत्न करणे तसेच शाळा आणि पालकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे आणि मुला-पालकांचा हरवलेला संवाद वाढवणे गरजेचे असल्याचा सूर 'शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या,' या चर्चासत्रामध्ये मान्यवरांनी लावला. या सत्रामध्ये राज्य बालहक्क


पाणी पुरवठा धरण मान्यता

आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे, आमदार निरंजन डावखरे, शिक्षणाधिकारी मीना यादव, बालहक्क आयोगाचे सदस्य विजय जाधव, पोलीस निरीक्षक आव्हाड आदि मान्यवर सहभागी झाले होते. 'ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभाग' आणि 'समन्वय प्रतिष्ठान, ठाणे' यांच्या वतीने ठाण्यातील एन. के. टी. महाविद्यालयाच्या सभागृहात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत जिल्ह्यातील मुख्याध्यापकांना मार्गदर्शन करण्यात आले.

## दिशा जीवनदायी आरोग्याची

**१००% दवाखान्यात बाळंतपणावर भर.**

दवाखान्यात बाळंतपण करण्याबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी विशेषतः शहापूर तालुक्यात आशा कर्मचारी, दाया यांनी घरी भेटी देऊन या योजनेबाबत सतत पाठपुरावा केला गेला.

* यामुळे घरगुती बाळंतपणाची संख्या कमी झाली असे उपलब्ध आकडेवारीवरून दिसून येते: एप्रिल ते ऑगस्ट २०१६ या कालावधीत १८९ बाळंतपणे घरी झाली तर एप्रिल ते ऑगस्ट २०१७ मध्ये फक्त ४९ बाळंतपणे घरी झाली.

**बाल व माता मृत्यूप्रमाण कमी होत आहे.**

* ० ते ५ वयोगटातील बालकांचे लसीकरण १०० टक्के पूर्ण करण्यात येत आहे.

**जिल्ह्यातील आरोग्य केंद्रे सुसज्ज**

* सद्यस्थितीत वज्रेश्वरी, किन्हवली व कसारा प्राथमिक आरोग्य केंद्राची बांधकामे NRHM मधून प्रगती पथावर आहेत.

## शेतीचा विकास

* राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी अशा ४ कोटी वृक्षारोपण मोहिमेत जिल्हा परिषदेने लक्षणीय योगदान दिले. दिलेल्या लक्ष्याचा आकडा पार करत जिल्हा परिषदेने यावर्षी २ लाख १६ हजार ५०९ झाडे लावली आहेत. या रोपांना जगविण्यासाठी तसेच ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी 'मनरेगा'अंतर्गत बिहार पॅटर्न नुसार नियोजन करण्यात आले आहे.
* रोखमुक्त व्यवहारांना चालना व प्रोत्साहन देण्यासाठी सर्व कृषी सेवा केंद्रांना POS यंत्रे पुरविण्यात आली आहेत.

## जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण

* जिल्हा परिषदेने जलयुक्त शिवार अभियानाचे लक्ष्य १००% साध्य केले. 'जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण' या मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील योजनेतून पंधरा दिवसांच्या कालावधीत जवळजवळ १८,३९१ घनमीटर गाळ धरणांतून काढला गेला.
* ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक भीमनवार यांच्या सूचनेप्रमाणे जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाने भिवंडी आणि कल्याण उपविभागातील कामे हाती घेतली होती. यामध्ये खानिवली, चिंबीपाडा, कुन्हे, खांडपे, कुडाचा पाडा, कोशिंबडे, नाडगाव, कोसले, तुळई, चौरे, मोखावणे, टेंभा वाकपाडा अशा व इतर कामांचा समावेश होता. लोकसहभाग तसेच नरेगाच्या माध्यमातून ही कामे झाली. १९ जेसीबी आणि १९ डंपर्स या कामी उपयोगात आले.

**सोनोग्राफी तपासणी मधून गरोदरपणातील संभाव्य धोके, गुंतागुंत वेळीच निदर्शनास आल्याने त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांना यश आले**

* जलसंपदा विभागाने त्यांच्या ठेकेदारांमार्फत सीएसआरचा भाग म्हणून काम करून घेतले असून अंबरनाथमधील भोज लघु प्रकल्प, उसगांव लघु प्रकल्प, शहापूर मधील वेहळोली, खराडे, व मुरबाडमधील जांभुर्डे प्रकल्पातील गाळ काढण्यात आला.
* गेल्या २ वर्षात २६+१८ असे एकूण ४४ गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना राबविण्यात आली.
* उपरोक्त वर्षात जि.प.च्या लघुपाटबंधारे व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून एकूण १३७ कामे घेण्यात आली. त्यापैकी १३४ कामे पूर्ण करण्यात आली.
* जलयुक्त शिवार योजना अंतर्गत टंचाईग्रस्त ६ ठिकाणी जलकुंभ बांधले गेल्याने हे जलकुंभ पाणी टंचाईच्या कालावधीत उपयुक्त ठरले अशी माहिती कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) आर टी प्रभाकर यांनी दिली.

## पशुपालन

* पशुवैद्यकीय दवाखाना सेवा पुरविण्यामध्ये / दर्जेदार सेवा पुरविण्याच्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यातून २ पशुवैद्यकीय दवाखाना संस्थांचे मानांकन (ISO ९००२:२०१५) करण्याचे नियोजन
* अनुसूचित जाती/ नवबौद्ध लाभार्थींना सुधारित जातीच्या म्हशी व संकरित गायी पालनासाठी प्रोत्साहन व सुधारित जातींच्या म्हशींची/ संकरित गायींची जोपासना करण्यासाठी व दूध

# प्रमुख योजनांची अंमलबजावणी

उत्पन्नात वाढ होण्याकरिता पशुखाद्य देण्यात येते. प्रत्येक गाय/ म्हशीसाठी ९० किलो पशुखाद्य १००% अनुदानावर देण्यात येते.

✼ पशुसंवर्धन विभागामार्फत औषधोपचार, लसीकरण, कृत्रिम रेतन इत्यादी सेवा पुरविण्याबरोबरच विविध योजना जसे वैरण विकास, दुधाळ जनावरांचे गट पुरवठा, शेती गट पुरवठा व कुक्कुट गट पुरवठा केला जाणे.

✼ जिल्हा परिषदेने ११ पोल्ट्री मदर युनिट्सची स्थापना केली आहे. या अन्वये गावपातळीवर महिलांना कुक्कुट पक्षी उपलब्ध होतात.

## ग्रामीण भागातील भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण:

✼ भटक्या कुत्र्यांच्या या त्रासावर उपाय म्हणून ठाण्याजवळच्या काही खेड्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या आर्थिक सहकार्याने भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याचा प्रस्ताव आहे.

## गतिमान आणि कार्यक्षम प्रशासन

✼ कर्मचाऱ्यांची गाऱ्हाणी सोडविण्यासाठी **त्रैमासिक कर्मचारी समाधान दिवस** पाळण्याची नावीन्यपूर्ण योजना जिल्हा परिषद कार्यालयामध्ये राबविण्यात येत आहे.

✼ सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्मचाऱ्यांची प्रलंबित गाऱ्हाणी सोडविण्याबाबत परिपत्रक पाठविण्यात आले आहे.

✼ 'अभिलेख अद्ययावतीकरण व झीरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोजल' अर्थात 'शून्य प्रलंबितता आणि दैनिक निर्गती' या कार्यालयीन पद्धतीचा अवलंब ठाणे जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत या तीनही स्तरांवर करण्यात येत आहे, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) चंद्रकांत पवार यांनी सांगितले.

## सामाजिक न्यायाच्या दिशेने

✼ समाजकल्याण विभागाअंतर्गत जिल्हा परिषदे मार्फत मागील वर्षी २३ अपंग शाळा व २५ मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सीसीटीव्ही लावण्यात आले.

✼ जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती आणि संस्थांचा भव्य विक्री मेळावा आयोजित करून दिव्यांगांना दिवाळीनिमित्त बाजारपेठ उपलब्ध करून दिली.

✼ आंतरजातीय विवाह करणाऱ्या १३७ जोडप्यांना प्रोत्साहनात्मक अनुदानापोटी प्रत्येकी ५० हजार रुपये वाटप.

✼ 'जिल्हा परिषद सेस' अंतर्गत सन २०१६-१७ साठी 'दलित वस्ती सुधार' योजनेअंतर्गत ७४ कामे मंजूर असून (१८ समाजमंदिरे व ५६ जोड रस्ते) रु.१.६० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून कामे प्रगतीत आहेत.

## महिलांचे सक्षमीकरण

✼ 'माझी कन्या भाग्यश्री' सुधारित योजनेसाठी जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून या योजनेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संतोष भोसले यांनी सांगितले.

## किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन (MHM) सर्वंकष धोरण (तेजोमय) :

✼ या योजनेअंतर्गत मासिक पाळी व्यवस्थापन आणि जागृती याविषयी किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

✼ ठाणे जिल्हा परिषदेने किशोर मुलींच्या मासिक पाळीच्या व्यवस्थापनाबाबत राबविलेल्या कार्यक्रमाची UNICEF ने प्रशंसा केली असून ती पद्धत संपूर्ण राज्यात स्वीकारली गेली आहे.

✼ या कार्यक्रमात अन्य वेगवेगळ्या गोष्टींचा समावेश करून एक परिपूर्ण अशी 'तेजोमय' नावाची योजना तयार केली गेली आहे.

✼ UNICEF ने २८ मे हा दिवस 'मासिक पाळी आरोग्य दिन' म्हणून जाहीर केला आहे.

✼ ठाणे जिल्हा परिषदेच्या पुढाकाराने राज्यशासनाने या प्रश्नावर जागृती निर्माण करण्यासाठी पहिल्यांदा राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित केला होता, अशी माहिती डॉ. तरुलता धानके यांनी दिली.

## मुख तपासणी अभियान

महात्मा गांधी जयंती दिनी राज्यात सुरु करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या मिशन अन्त्योदय, ग्रामसमृद्धी व स्वच्छता अभियानाबरोबरच, राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या संकल्पनेतून नावीन्यपूर्ण मुख स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले असून ठाणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये विद्यार्थ्यांची मुख तपासणी करण्यात येत आहे.



प्रशासनामध्ये झीरो पेन्डन्सी




◀ जिल्ह्यातील शाळा १००% डिजिटल केल्या यास्तव मा. राज्यपाल (महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना शिक्षणाधिकारी मीना यादव. सोबत मा. शिक्षण मंत्री (महाराष्ट्र राज्य)



विद्यार्थी सुरक्षा

केवळ खासगी वितरणासाठी.

ठाणे जिल्हा परिषद

**प्रकाशक:** जिल्हा परिषद, ठाणे. **संकल्पना:** विवेक भीमनवार (मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद), **मार्गदर्शक :** रवींद्र पाटील (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी), गीता नागर (मुख्य लेखा व वित्त अधिकारी), चंद्रकांत पवार (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, **संकलन व माहिती संपादन :** पंकज चव्हाण, जनसंपर्क अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद. **विशेष सहकार्य :** अनिरुद्ध अष्टपुत्रे (जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे)

**मांडणी व मुद्रण:** मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., फो: ९८१९९-०७९८२